27-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/26/2025 9:30 PM Page 1

निवडक

सौरव गांगुलीच्या भावाची स्पीड बोट उलटली

भुवनेश्वर, दि. २६: भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सौरव गांगुली यांचे मोठे बंधू आणि त्यांची पत्नी मोठ्या दुर्घटनेतून थोडक्यात बचावले आहे. सौरव गांगुली यांचे मोठे बंधू स्नेहाशीष गांगुली आणि त्यांची पत्नी अर्पिता यांची स्पीडबोट अचानक उलटली. या दुर्घटनेतून दोघे वाचले. पोलिसांनी सोमवारी ही माहिती दिली. ही घटना शनिवारी संध्याकाळी लाईटहाऊसच्या जवळ घडली. त्यावेळी स्नेहाशीष आणि अर्पिता स्पीडबोट चालवण्याचा आनंद घेत होते. ही घटना ओडिशात घडली असून त्याचा व्हिडीओ समोर आला आहे. गांगुली दाम्पत्य ओडिशाच्या पुरी समुद्र किनाऱ्यावर फिरायला गेले होते. वॉटर स्पोर्ट्स ऍक्टिव्हिटी सुरु असताना दाम्पत्याच्या स्पीड बोटला अपघात झाला. सौरव गांगुलीचा मोठा भाऊ आणि वहिनी अपघातापासून थोडक्यात बचावले. घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. त्यात स्पीड बोट उलटलेली दिसत आहे. जीव रक्षकांकडून पर्यटकांना वाचवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पर्यटकांचा जीव वाचवण्यासाठी अधिकाऱ्यांनी रबरी फ्लोटचा वापर केला.

सौरव गांगुली यांचे बंधू स्नेहाशीष आणि त्यांची पत्नी अर्पिता यांनी त्यांची आपबिती कथन केली. 'बोटीमध्ये कमी प्रवासी होते. त्यामुळे ती हलकी होती. समुद्र अतिशय उग्र होता. त्यामुळे बोट उलटली. बोटीची क्षमता १० प्रवाशांची होती. पण पैशांच्या लालसेपोटी चालकानं केवळ ३ ते ४ जण चढल्यावरच बोट सोडली. त्या दिवशी समुद्रात जाणारी ती शेवटची बोट होती. समुद्रात जाताना आम्हाला भीती वाटत होती. आम्ही ती बोट चालकाकडे बोलूनही दाखवली. पण परिस्थिती नियंत्रणात असल्याचं त्यांनी सांगितले, अशी माहिती अर्पिता यांनी दिली.

रोहित आणि विराट दोघांचीही कॅप्टन्सी वेगळी

मुंबई, दि. २६ :

इंग्लंड दौऱ्याआधी शुभमन गिल मनातले बोलला

आगामी इंग्लंड दौऱ्यासाठी बीसीसीआयने टीम इंडियाची घोषणा केलेली आहे. रोहित शर्मा याच्या निवृत्तीनंतर टीम इंडियाची धुरा गिलकडे सोपवली गेली आहे. आता संघामध्ये वरिष्ठ खेळाडू कमी असून युवा खेळाडूंवरच टीम इंडियाची भिस्त असणार आहे. या दौऱ्याला जाण्यापूर्वी नवीन कर्णधार शुभमन गिल याने आपले परखड मत मांडताना रोहित आणि विराट यांनी यांच्याच मार्गावर चालणार असल्याचे म्हटले आहे. शुभमन गिल नेमके काय म्हणाला जाणून घ्या.

'रोहित शर्मा, विराट कोहली आणि आर. अश्विन यांनी परदेशात जिंकण्याचा मार्ग दाखविला आहे. परदेशात लढती, मालिका कसे जिंकायचे हे त्यांनी शिकवले आहे. त्याच मार्गावरून वाटचाल करणार आहे, असे भारताचा युवा कसोटी कर्णधार शुभमन गिल याने सांगितले.

गिलची शनिवारी भारतीय कसोटी संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. २५ वर्षीय गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. अर्थात, आता गिलच्या संघात रोहित, कोहली, अश्विन नसतील, मालिकेतील पहिली कसोटी २० जूनपासून सुरू होणार आहे. त्यापूर्वी गिलने इंग्लंडमध्ये नवीन शिलेदारांसह चांगली कामगिरी करण्याचा विश्वास व्यक्त केला. रोहित, कोहलीच्या कर्णधारपदाच्या शैलीबाबत बीसीसीआयशी बोलताना गिल म्हणाला.

कोहली, रोहितच्या शैलीत खूप फरक आहे. मात्र, दोघांचे ध्येय एकच होते. कर्णधार म्हणून तुम्हाला विजय मिळवायचे असतात. तुमची शैली कदाचित वेगळी असेल. मात्र, स्वतःचा वेगळा ठसा त्यांनी उमटविला आहे. विराट नेहमीच आक्रमक असायचा. विजयाची भूक त्याच्यात होती, रोहित बाहेरून शांत असला, तरी मैदानात तोही तेवढाच आक्रमक असायचा, कदाचित तुम्हाला त्याच्या मैदानावरील हावभावांवरून अंदाज लावता येणार नाही. रोहित शांतपणे निर्णय घेतो. खेळाडूंशी सातत्याने त्याचा संवाद असतो. खेळाडूंकडून काय हवे आहे, याबाबत तो नेहमी स्पष्ट असायचा. हे गुण त्याच्याकडूनच शिकलो आहे.

सूर्यकुमार यादव तेंडुलकरचा विक्रम मोडण्याच्या तयारीत

मुंबई, दि. २६ :

आयपीएल २०२५ स्पर्धेतील ६९ वा सामना जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्स दोन्ही संघात खेळला जाणार आहे. या सामन्यात सूर्यकुमार यादवच्या नजरा इतिहास रचण्यावर असतील. सूर्यकुमार यादवने या हंगामात शानदार प्रदर्शन केले आहे. त्याने १३ सामन्यात ७२.८७ च्या सरासरीने आणि १७०.४६ च्या स्ट्राईक रेटने ५८३ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ४ अर्धशतक झळकावली आहेत. सूर्यकुमार यादवने या हंगामात ५०० धावसंख्या जेव्हा पूर्ण केली तेव्हाच मुंबईसाठी एका हंगामात ३ वेळा ५०० आणि त्यापेक्षा अधिक धावा करणारा फलंदाज तो ठरला आहे.

सूर्यकुमार यादव जर पंजाब विरुद्ध सामन्यात ३६ धावा अजून करू शकला, तर तो आयपीएलच्या हंगामात मुंबईसाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरेल. आयपीएलच्या हंगामात मुंबई इंडियन्ससाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज सचिन तेंडुलकर आहे. ज्यांनी २०१० मध्ये ४७.५ च्या सरासरीने आणि १३३ च्या स्ट्राईक रेटने ६१८ धावा केल्या होत्या. या यादीमध्ये दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर सूर्यकुमारच आहे. तसेच चौथ्या स्थानावर सचिन आणि पाचव्या स्थानावर लेंडल सिमंस आहे.

सूर्यकुमार यादव या हंगामात पाच वेळा नाबाद खेळलेला आहे आणि बाकी सामन्यात सुद्धा नाबाद राहून खेळण्याचा तसेच मोठी पारी खेळण्याचा त्याचा प्रयत्न असेल. जर सूर्यकुमारने अशाच पद्धतीने प्रदर्शन केले तर तो विराट कोहलीच्या कोणत्याही एका हंगामात सर्वाधिक सरासरीने धावा करणारा फलंदाज ठरेल.

आयपीएलच्या कोणत्याही हंगामात कमीत कमी ५०० धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये सर्वात चांगली सरासरीचा विक्रम विराट कोहलीच्या नावावर आहे. ज्याने २०१६ मध्ये १६ डावांमध्ये ८१.१ च्या सरासरीने ९७३ धावा केल्या होत्या. त्यादरम्यान विराट कोहलीचे स्ट्राईक रेट १५२ होते. सूर्यकुमार यादव या यादीमध्ये दुसऱ्या स्थानावर आहे.

ही एक सुद्धा खास बाब आहे की, सूर्यकुमार यादव आयपीएलच्या इतिहासात कोणत्याही हंगामात १७० + अधिक स्ट्राईक रेट ७०+ सरासरीने ५०० पेक्षा जास्त धावा करणारा एकमात्र फलंदाज आहे.

प्रियांक पांचाळची प्रथम श्रेणी क्रिकेटमधून निवृत्ती घोषणा

मुंबई, दि. २६ :

प्रियांक पांचालची प्रथम श्रेणी क्रिकेट कारकिर्द

१२७ सामने
८,८५६ धावा
४५.१८ सरासरी
२९ शतके
३४ अर्धशतके
३१४ सर्वोच्च धावसंख्या

रोहित शर्मा आणि विराट कोहली या टीम इंडियाच्या अनुभवी खेळाडूंनी काही दिवसांपूर्वी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. त्यानंतर आता भारतीय क्रिकेट वर्तुळातून मोठी बातमी समोर आली आहे. रोहित विराटनंतर भारताच्या आणखी एका खेळाडूने क्रिकेटमधून तडकाफडकी निवृत्ती जाहीर केली आहे. या स्टार खेळाडूने रोहित विराटप्रमाणेच सोशल मीडियावरुन निवृत्त होत असल्याचं जाहीर केलंय. या खेळाडूने इंस्टाग्रामवर पोस्ट करत याबाबत माहिती दिली आहे. प्रियांक पांचाळ याने फर्स्ट क्लास क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. प्रियांक पांचाळ याने फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये भरीव योगदान दिलं. तसेच टीमला जिंकवण्यात निर्णायक भूमिका बजावली.

प्रियांका पांचाळ याने एकाएकी निवृत्तीचा निर्णय घेत फर्स्ट क्लास क्रिकेटमधील प्रवासाला अर्जंट ब्रेक लावला आहे. प्रियांक पांचाळ फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये गुजरातचं प्रतिनिधित्व करत होता. प्रियांक गुजरातच्या प्रमुख खेळाडूंपैकी एक होता. प्रियांकने अनेकदा अविस्मरणीय खेळी करत गुजरातचा एकहाती सामने जिंकून दिले होते. प्रियांकने त्याच्या कामगिरीची जोरावर फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये ठसा उमटवला होता. तसेच त्याने छापही सोडली होती. त्यामुळए प्रियांकला टीम इंडियात संधी मिळाली होती. मात्र दुर्दैवाने प्रियांकला पदार्पणाची संधी मिळाली नाही.

नोवाक जोकोविच जिनेव्हा ओपन विजेता

जिनेव्हा, दि. २७ :

शनिवारी झालेल्या थरारक अंतिम सामन्यात नोवाक जोकोविचने हुबर्ट हुर्काझचा पराभव करत जिनेव्हा ओपनचे जेतेपद पटकावले आणि आपल्या टूर-लेव्हल कारकिर्दीतील शंभराव्या विजेतेपदाची नोंद केली. हा सामना ५-७, ७-६ (२), ७-६ (२) असा तीन सेट्समध्ये रंगला आणि तब्बल तीन तास पाच मिनिटे चालला.

एटीपी टूरनुसार, हा स्पर्धेतील सर्वात लांब सामना ठरला. विजयानंतर प्रतिक्रिया देताना जोकोविच म्हणाला की , मला या विजयासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. हुबर्ट संपूर्ण सामन्यात बहुधा माझ्यापेक्षा विजयाच्या अधिक जवळ होता. पहिल्या सेटमध्ये जोकोविचला ब्रेक पॉइंट्स मिळाले होते, परंतु सेट पॉइंटवर डबल फॉल्ट करत त्याला सेट गमवावा लागला. मात्र, त्याने संयम राखत सामना पुन्हा आपल्या बाजूने वळवला.

तिसऱ्या सेटमध्ये मी त्याची सर्व्हिस ब्रेक केली, पण कदाचित त्याने स्वतःच ती गमावली. अशा सर्वोच्च पातळीवरील लढतींमध्ये काहीच गुण निर्णायक ठरतात. संपूर्ण स्टेडियमने छान वातावरण निर्माण केले. अशा ऐतिहासिक विजयासाठी मी कृतज्ञ आहे, असे जोकोविचने पुढे सांगितले.

तिसऱ्या सेटमध्ये जोकोविच २-४ ने पिछाडीवर असताना, त्याने आपली लढवय्या वृत्ती दाखवत सामन्यात पुनरागमन केले. ४-३ च्या आघाडीवर असताना हुर्काझने केलेल्या डबल फॉल्टचा फायदा घेत जोकोविचने निर्णायक ब्रेक घेतला.

या विजयासह जोकोविच ओपन एरामध्ये १०० टूर-लेव्हल विजेतेपद गाठणारा तिसरा खेळाडू ठरला आहे. त्याआधी जिमी कॉनर्स (१०९) आणि रॉजर फेडरर (१०३) यांनी हे यश मिळवले आहे. जोकोविचने आपले पहिले एटीपी विजेतेपद २००६ मध्ये निकोलस मासूविरुद्ध जिंकले होते. विशेष म्हणजे मासू सध्या हुर्काझचे प्रशिक्षक आहेत.

पॅरिस ऑलिंपिक २०२४ मध्ये सुवर्णपदक मिळवल्यानंतर जोकोविचचे हे पहिले विजेतेपद ठरले. त्याचबरोबर तो ओपन एरामध्ये सलग २० हंगामांत किमान एक विजेतेपद जिंकणारा पहिला खेळाडू बनला आहे. ३८ वर्षांचा असलेला जोकोविच हा जिनेव्हा ओपन जिंकणारा सर्वात ज्येष्ठ खेळाडू ठरला आहे.

हुबर्ट हुर्काझने सामना सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा घेतला होता. शेवटच्या सेटमध्ये त्याने पहिल्या तीन सर्व्हिस गेममध्ये एकही गुण गमावला नव्हता. मात्र, निर्णायक क्षणी त्याच्या चुका त्याला महागात पडल्या. हुर्काझ याचे हे नववे एटीपी विजेतेपद आणि क्ले कोर्टवरील दुसरे विजेतेपद मिळवण्याचे स्वप्न अधुरे राहिले. त्याच्या दमदार कामगिरीनंतरही जोकोविचने आपली लवचिकता दाखवत ऐतिहासिक पुनरागमन केले.

हैदराबादचा ११० धावांनी धमाकेदार विजय

नवी दिल्ली, दि. २६ :

सनरायजर्स हैदराबादने पॅट कमिन्स याच्या नेतृत्वात गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सवर मोठ्या फरकाने मात करत आयपीएलच्या १८ व्या मोसमातील शेवट विजयाने केला आहे. हैदराबादने केकेआरचा ११० धावांनी धुव्वा उडवला. हैदराबादने केकेआरसमोर विजयासाठी २७९ धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र हैदराबादच्या गोलंदाजांनी गतविजेत्यांना १८.४ ओव्हरमध्ये १६८ रन्सवर गुंडाळले. हैदराबादने यासह आयपीएलच्या इतिहासातील त्यांचा दुसरा सर्वात मोठा विजय साकारला. तसेच हैदराबादने या विजयासह या हंगामात विजयी हॅटट्रिकही पूर्ण केली. हैदराबादने त्यांच्या साखळी फेरीतील शेवटचे ३ सामने जिंकले.

कोलकाताचे फलंदाज डोंगराएवढ्या आव्हानाचा पाठलाग करताना फ्लॉप ठरले. सुनील नारायण, मनीष पांडे आणि हर्षित राणा या तिघांचा अपवाद वगळता इतर कुणालाही ३० पेक्षा अधिक धावा करता आल्या नाहीत. सुनील नारायण याने ३१, हर्षित राणा याने ३४ तर मनीष पांडे याने सर्वाधिक आणि ३७ धावा केल्या. दोघांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. तर दोघे आले तसेच परत गेले अर्थात भोपळाही फोडू शकले नाहीत. सनरायजर्स हैदराबादच्या जयदेव उनाडकट, एशान मलिंगा आणि हर्ष दुबे या त्रिकुटाने केकेआरचे पॅकअप केले. या तिघांनी प्रत्येकी ३-३ विकेट्स घेतल्या.

हैदराबादची तोडफोड बॅटिंग

त्याआधी हैदारबादने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय केला आणि आयपीएल इतिहासातील तिसरी सर्वोच्च धावसंख्या उभारली. हैदराबादने २० ओव्हरमध्ये ३ विकेट्स गमावून २७८ रन्स केल्या. हैदराबादसाठी हेनरिक क्लासेन याने सर्वाधिक धावांचे योगदान दिले. क्लासेन याने आयपीएल इतिहासातील संयुक्तरित्या तिसरे सर्वांत वेगवान शतक झळकावलं. क्लासेनने ३७ बॉलमध्ये शतक पूर्ण केले. तर ३९ बॉलमध्ये ९ सिक्स आणि ७ फोरसह नॉट आऊट १०५ रन्स केल्या. ट्रेव्हिस हेड याने ४० चेंडूत ७६ रन्स केल्या. तर अभिषेक शर्मा याने ३२ आणि इशान किशन २९ रन्स केल्य. तर अनिकेत वर्मा याने नाबाद १२ धावा केल्या. केकेआरसाठी सुनील नारायण याने २ विकेट्स मिळवल्या. तर वैभव अरोरा याने एक विकेट घेतली.

दरम्यान हैदराबादने या विजयासह केकेआरचा आणखी एक हिशोब क्लिअर केला. केकेआरने केलेल्या पराभवाची हैदराबादने परतफेड केली. हैदराबाद विरुद्ध केकेआर या दोन्ही संघांची १८ व्या मोसमात आमनेसामने येण्याची दुसरी वेळ होती. याआधी दोन्ही संघ ३ एप्रिल रोजी आमनेसामने आले होते. तेव्हा कोलकाता नाईट रायडर्सने सनरायजर्स हैदराबादवर ८० धावांनी दणदणीत विजय मिळवला होता. हैदराबादने जाता जाता केकेआरचा हिशोब बरोबरक केला.

हेनरिक क्लासेनचे ३७ चेंडूत वादळी शतक

सनरायझर्स हैदराबादचा स्फोटक फलंदाज हेनरिक क्लासेन याने आयपीएलच्या १८ व्या मोसमातील ६८ व्या सामन्यात इतिहास घडवला आहे. हेनरिक क्लासेन याने नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये झंझावाती शतक झळकावलं आहे.हेनरिकने हैदराबादच्या हंगामातील शेवटच्या अर्थात १४ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध ही कामगिरी केली. हेनरिकचे हे आयपीएलमधील दुसरे शतक ठरले आहे. हेनरिकने या वादळी शतकासह अनेक विक्रमांची बरोबरी करण्यासह अनेक रेकॉर्ड्स ब्रेक केले आहेत.

सनरायजर्स हैदराबादचा विकेटकीपर बॅट्समन हेनरिक क्लासेन याने अवघ्या ३७ बॉलमध्ये हे शतक पूर्ण केलं. हेनरिकने या शतकी खेळीत ६ चौकार आणि ९ षटकार लगावले. हेनरिक यासह सनरायजर्स हैदराबादसाठी आयपीएल इतिहासात वेगवान शतक करणारा पहिला फलंदाज ठरला. हेनरिकने याबाबतीत ट्रेव्हिस हेड याचा रेकॉर्ड ब्रेक केला. हेडने ३९ बॉलमध्ये शतक केले होते. हेडने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु विरुद्ध आयपीएल २०२४ मध्ये १५ एप्रिल रोजी ही कामगिरी केली होती.

करुण नायरचे भारतीय संघात पुनरागमन

मुंबई, दि. २६ :

भारतीय संघ २०२५-२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची सुरुवात इंग्लंड दौऱ्याने करेल जिथे ते यजमान संघाविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळतील. या दौऱ्यात टीम इंडियाचा पहिला सामना २० जून रोजी खेळणार आहे. त्याच वेळी, टीम इंडियाच्या निवड समितीने या दौऱ्यासाठी संघ जाहीर केला आहे, ज्यामध्ये शुभमन गिलला कसोटी संघाचा नवीन कर्णधार म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे, तर करुण नायर ८ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर परतला आहे. आता करुण नायरचीही टीम इंडियात पुनरागमनाबाबत प्रतिक्रिया आली आहे.

आयपीएल २०२५ च्या हंगामात, करुण नायर दिल्ली कॅपिटल्स संघाकडून खेळत आहे, ज्यामध्ये २४ मे रोजी संध्याकाळी त्याच्या संघाचा सामना पंजाब किंग्जशी झाला, ज्यामध्ये त्यांनी ६ विकेट्सने विजय मिळवला. या सामन्यात करुण नायरच्या बॅटने २७ चेंडूत ४४ धावांची खेळी साकारली. सामन्यानंतर बोलताना नायरने भारतीय कसोटी संघात पुनरागमनाबद्दल सांगितले की, मी पुनरागमन करू शकलो याबद्दल मी खूप आभारी आहे.

मी भाग्यवान आहे की मला ही संधी मिळाली. मलाही तुमच्यासारखेच कळले. मी खूप दिवसांपासून याची वाट पाहत होतो. अनेक अभिनंदनाचे संदेश मिळाले आहेत. करुण नायरने त्याचा शेवटचा कसोटी सामना २९८२ दिवसांपूर्वी खेळला होता जेव्हा त्याला २०१७ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध धर्मशाला कसोटीत खेळण्याची संधी मिळाली होती.

करुण नायरने त्याच्या कसोटी क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात शानदार केली ज्यामध्ये तो वीरेंद्र सेहवागनंतर त्रिशतक करणारा दुसराच खेळाडू ठरला. जर आपण नायरच्या कसोटी कारकिर्दीवर नजर टाकली तर त्याने ६ सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने ७ डावांमध्ये फलंदाजी करताना ६२.३३ च्या उत्कृष्ट सरासरीने ३७४ धावा केल्या आहेत आणि त्याच्या बॅटमधून एक शतकही दिसून आले आहे. यावर्षी दिल्लीने मेगा लिलावात करुण नायरला ५० लाखात रुपयांत समावेश करुन घेतला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २६४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 264 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .